४७०

जा.क्र. सनिमं/प्रशा/क.७७-१ अ/अ.बदल/आदेश/ /२०१५
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मंगळवेढा
यांचे कार्यालय, मंगळवेढा दिनांक १६/०७/२०१५

**वाचा** :- १.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-१(अ)
२.या कार्यालयाचे आदेश जा.क्र.सनिमं/कलम ७७-१अ/प्रा.अधि./
३४६/सन १५ दिनांक ६/०७/२०१५ चे आदेश.

ज्या अर्थी उक्त वाचा क्र.२ चे आदेशान्वये मानेवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सस्था मर्या., या संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करुन त्यांचे ऐवजी संस्थेचे दैनंदिन कामकाज व संस्थेच्या मतदार याद्या तयार करुन निवडणूकीची व्यवस्था करण्यासाठी प्रशासक / प्राधिकृत अधिकारी म्हणून तीन महिन्यांसाठी श्री.एन.बी.नदाफ बँक इन्स्पेक्टर यांची नेमणूक केलेली आहे.

ज्या अर्थी संस्थेने मुदतीत मतदार याद्या सादर करण्यात कसूर केला आहे त्यामुळे प्रशासकीय कामकाजाचे दृष्टीकोनातून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदीनुसार कलम ७७-१ अ अन्वये प्रशासक / प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करतांना शासकीय कर्मचा-याची नियुक्ती करणे संयुक्तिक होईल अशी माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी वरील प्रमाणे आदेशात खालील प्रमाणे अंशतः बदल करीत आहे.

**:: आ दे श ::**

मी बालाजी कटकदौंड, तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मंगळवेढा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-१ (अ)(ब) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन मानेवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि., मानेवाडी ता.मंगळवेढा या संस्थेची मुदत संपुष्टात आलेले संचालक मंडळ बरखास्त करुन त्यांच्या ऐवजी संस्थेचे दैनंदिन कामकाज व संस्थेच्या मतदार याद्या तयार करुन निवडणूकीची व्यवस्था करण्यासाठी प्रशासक / प्राधिकृत अधिकारी म्हणून तीन महिन्यासाठी श्री.एस.एस.जाधव, मुख्य लिपीक यांची नेमणूक करत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक १६/०७/२०१५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी पारीत करीत आहे.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मंगळवेढा, तालुका

**तालुका निवडणूक अधिकारी तथा**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.मंगळवेढा**

प्रति,
१.श्री.एस.एस.जाधव, मुख्य लिपीक, प्रशासक / प्राधिकृत अधिकारी मानेवाडी वि.का.सेवा सह.संस्था म., मानेवाडी
२.चेअरमन / व्हा.चेअरमन, मानेवाडी वि.का.सेवा सहकारी संस्था मर्या., मानेवाडी ता.मंगळवेढा
३.सरव्यवस्थापक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सोलापूर
४.शाखा व्यवस्थापक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि,.सोलापूर शाखा -----------------

<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर :-</u>
मा.सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा.पुणे.
मा.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर